**Aarhat Multidisciplinary International Education Research Journal (AMIERJ)**
A Peer Reviewed Multidisciplinary Journal UGC Approved Journal No 48178, 48818
Impact Factor 5.18 ISSN 2278-5655

# हिंगोली जिल्ह्यातील आदिवासी शेतकऱ्यांना वीजपंप / तेलपंप तसेच एच.डी.पी.ई. पाईप पुरवठा योजनेचा मूल्यमापनात्मक अभ्यास

**मंगल नागोराव मारकड**
*संशोधक विद्यार्थीनी*
*स्वा.रा.ती.म.विद्यापीठ,नांदेड.*

**प्राचार्य डॉ.जे.एस.भोयर**
*कै.बाबुराव पाटील कला विज्ञान*
*महाविद्यालय, हिंगोली*

**प्रस्तावना**

शेती हा आदिवासी लोकांचा पारंपारिक व्यवसाय आहे. महाराष्ट्रातील 80 टक्के आदिवासी शेतीवर अवलंबून आहेत. अधिकांश आदिवासी फक्त पावसाळ्यात निकृष्ट प्रतीच्या धान्याचे उत्पादन काढतात त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखीची असल्यामुळे त्यांनी वर्षातून दोन - तीन पिके काढणे सोयची व्हावे म्हणून त्यांना जलसिंचनाची सोय करून द्यावी या उद्देशाने त्यांच्या शेतीतील विहरीवर अथवा जवळपासच्या नदीनाल्यावर नवीन वीजपंप वसवून देण्याची योजना सन 1973 - 74 पासून कार्यान्वित करण्यात आली व ज्यासाठी विद्युतलाईन उपलब्ध नाही किंवा नजीकच्या काळात विद्युत कनेक्शन मिळणे शक्य होणार नाही अशा शेतकऱ्यांना 5 अश्वशक्तीचे तेलपंप देण्याची योजना 1976 - 77 पासून सुरू करण्यात आली साधारणत: ज्या शेतकऱ्यांच्या मालकीची कमीत कमी 60 आर व जास्तीत जास्त 4 हेक्टर स्वत:च्या मालकीची जमीन असेल अशा शेतकऱ्यांना वीजपंप/तेलपंप तसेच एच.डी.पी.ई पाईप्सचा पुरवठा करण्यात येतो. अशा मोफत पुरविलेल्या वीजपंप, तेलपंप, पाइप्स द्वारे आदिवासींनी त्यांच्या स्वता:च्या शेतीची प्रगती करून घेणे अपेक्षीत आहे ह्या उद्देशानेच आदिवासी विभागाकडून हि योजना राबविण्यात येते.

2011 सालच्या जनगनेनुसार महाराष्ट्रामध्ये अनुसूचित जमातीची लोकसंख्या 1,05,10,213 एवढी असुन राज्याच्या एकून लोकसंख्येशी हे प्रमाण 9.35% आहे. तसेच मराठवाड्याची एकून लोकसंख्या 1,87,31,872 एवढी असुन त्यामध्ये अनुसूचित जमातीची लोकसंख्या 7,46,041 एवढी आहे. हे प्रमाण 3.98% आहे. हिंगोली जिल्ह्यातील आदिवासींची लोकसंख्या 1,11,954 एवढी असून जिल्हा लोकसंख्येशी हे प्रमाण 9.51% आहे. तसेच हिंगोली जिल्ह्यामध्ये

मराठवाड्यातील एकून आदिवासी पैकी 51% आदिवासींचे वास्तव्य आहे. हिंगोली जिल्ह्यात आढळुन येणारी आदिवासी जमात ही **आंध** आहे जिल्हा ठिकाणावरील अगदीच अल्प संख्येने असलेला अनिर्देशित आदिवासींचा अपवाद सोडला तर हिंगोली जिल्हा हा राज्यामधला असा एकमेव जिल्हा आहे की - जेथे केवळ एकाच जमातीचे लोक आढळतात **आंध** जमातीचे लोक मुख्यता शेती व मोलमजुरी वरच आपली उपजीविका भागवतात म्हणुन या अनुसूचित जमातीतील लोकांचा अर्थिक स्तर उंचावण्यासाठी शासन स्तरावरून विविध आदिवासी योजना मार्फत आर्थिक साह्य किंवा प्रत्यक्ष वस्तुच्या स्वरुपात त्यांना साह्य करण्यात येते. त्यापैकी तेलपंप / वीजपंप तसेच एच.डी.पी.ई पाईपचा पुरवठा करण्यात येतो. म्हणुन या योजनेचे मूल्यमापन करण्यासाठी हिंगोली जिल्ह्यातील आदिवासी लाभधारक शेतकऱ्यांचा मूल्यामापना करीता निवड करण्यात येवुन पाहणी करण्यात आली आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

1) वीजपंप / तेलपंप तसेच एच.डी.पी.ई. पाईप या योजनेची हिंगोंली जिल्ह्यातील फलनिष्पती तपासणे
2) आदिवासी लाभार्थी शेतकऱ्यांच्या योजना लाभानंतरच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे
3) वीजपंप / तेलपंप तसेच एच.डी.पी.ई. योजने संदर्भात शासनाला शिफारशी सुचवणे.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत शोध निबंधात प्रथम सामग्री व दुय्यम सामग्रीचा वापर करण्यात आला प्राथमिक सामग्री मध्ये मुलाखत, प्रश्नावली, निरीक्षण इत्यादी संशोधन साहित्याचा वापर करण्यात आला. तसेच दुय्यम सामग्री मध्ये संदर्भ ग्रंथ, आदिवासी संशोधन पत्रिका, आदिवासी विकास विभाग माहिती पुस्तीका, वार्षीक आदिवासी उपयोजना तसेच वेबसाईट वरील उपयुक्त माहितीचा आधार घेण्यात आला.

**मूल्यमानाची कार्य पध्दती :-**

तेलपंप व एच.डी.पी.ई. पाईप्स वाटप या योजनेचे मूल्यमान करण्यासाठी एक प्रश्नावली तयार करण्यात आली होती. या प्रश्नावलीमध्ये कुंटूबाची वैयक्तीक माहिती, कुंटूबाचा मुख्य व दुय्यम व्यवसाय, कुंटूबाने धारण केलेले जमीनीचे क्षेत्र, कुंटूबाचे वार्षीक उत्पन्न त्याच बरोबर कुंटूब

प्रमुखाचे शिक्षण इत्यादी माहिती गोळा करण्यात आली आहे. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय कळमनुरी अंतर्गत असलेल्या हिंगोली जिल्ह्यातील पाच तालुक्याचा अभ्यास नमुना म्हणुन निवड करण्यात आली असुन प्रत्येक तालुक्यातुन तेलपंप / विजपंप व एच.डी.पी.ई पाईप्स योजनेचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यींची अभ्यास नमुना म्हणून निवड करण्यात आली आहे. एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, कळमनुरी अंतर्गत अभ्यास नमुना म्हणुन हिंगोली जिल्ह्यातील तेलपंप / वीजपंप व एच.डी.पी.ई. पाईप्स चा लाभ घेतलेल्या लाभार्थींची तालुका निहाय संख्या.

**एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय कळमनुरी अंतर्गत नमुना लाभक्षेत्र**
**जिल्हा हिंगोली**

| **तालुक्याचे नाव** | **कळमनुरी** | **हिंगोली** | **औंढा** | **सेनगांव** | **वसमत** | **एकून** |
|---|---|---|---|---|---|---|
| लाभर्थी संख्या | 54 | 45 | 48 | 42 | 41 | 230 |

**(स्त्रोत - एकात्मिक आ.वि.प्रकल्प कार्यालय, कळमनुरी)**

अनुसूचित जामातीच्या लाभार्थीना शासकीय योजनेतून देण्यात आलेल्या योजनांची माहिती खालील प्रमाणे

| **अ.क्र** | **तालुका** | **तेलपंप** | **एच.डी.पी.ई. पाईप्स** | **तेलपंप व पाईप्स** | **एकून** |
|---|---|---|---|---|---|
| 1 | कळमनुरी | 21 | 28 | 04 | 54 |
| 2 | हिंगोली | 12 | 11 | 22 | 45 |
| 3 | सेनगांव | 20 | 21 | 02 | 42 |
| 4 | औंढा | 14 | 25 | 09 | 48 |
| 5 | वसमत | 17 | 09 | 15 | 41 |
| | **एकून** | **84** | **94** | **52** | **230** |

**(स्त्रोत - एकात्मिक आ.वि.प्रकल्प कार्यालय, कळमनुरी)**

अनुसूचित जमातीतील आर्थिक मागासलेल्या अनुसूचित शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती करुन त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या दृष्टीने शासनाने वरील प्रमाणे योजनेचा लाभ देण्यात आला आहे. तेलपंप लाभार्थी **- 84,** एच.डी.पी.ई पाईप्स लाभार्थी **- 94,** तसेच तेलपंप व पाईप्स या दोन्ही योजनांचा लाभ घेतलेले लाभार्थी **- 52** लाभार्थ्यांना शासकिय योजनेतुन लाभ देण्यात आला आहे.अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांकडे स्वत:च्या मालकीची असलेल्या जमिनीची तालुकानिहाय माहिती **(हेक्टर / आर)**

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal (AMIERJ)
A Peer Reviewed Multidisciplinary Journal UGC Approved Journal No 48178, 48818
EduIndex Impact Factor 5.18 ISSN 2278-5655

| अ.क्र | तालुका | लाभाथी संख्या | लाभापूर्वी | | लाभानंतर | | वाढ झालेली बागायत क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | जिरातयत | बागायत | जिरातयत | बागायत | |
| 1 | कळमनुरी | 54 | 67.99 | 0.00 | 0.00 | 67.99 | 67.99 |
| 2 | हिंगोली | 45 | 80.00 | 0.00 | 34.70 | 43.30 | 45.90 |
| 3 | औंढा | 48 | 154.54 | 21.00 | 146.73 | 28.81 | 07.81 |
| 4 | सेनगांव | 42 | 136.83 | 23.07 | 95.42 | 44.48 | 21.41 |
| 5 | वसमत | 41 | 100.77 | 0.00 | 8.62 | 92.15 | 92.15 |
| | **एकून** | **230** | **540.13** | **44.07** | **285.47** | **278.73** | **234.66** |

(स्त्रोत - प्राथमिक सर्वेक्षण )

वरील प्रमाणे अवलोकन केले असता लाभार्थ्यांकडे असलेली जिरायत जमनी क्षेत्र हेक्टर आर ही जमीन शासनाने अनुसूचित जमातींच्या लाभार्थ्यांची शेती ओलिताखाली आणण्यासाठी त्यांना तेलपंप / एच.डी.पी.ई पाईप्स यांचा पुरवठा केल्यामुळे वरीलप्रमाणे जिरायत जमीनीचे बागायतीमध्ये रुपांतर होवून लाभार्थी ज्वारी, सोयाबीन या परंपारिक पिका व्यतिरिक्त गहू, भुईमुंग, भाजीपाला अशी वेगवेगळी पिके घेऊ लागली असुन शासनाने त्यांना दिलेल्या योजनांमुळे त्यांचा आर्थीक स्तर उंचावण्यात मदत झाल्याचे दिसून येत

तालुका निहाय उत्पन्न माहिती खालीलप्रमाणे आहे

| अ .क | तालुका | रु. 10,000 च्या आतील | | 10,001 ते 20,000 | | 20,001 ते 30,000 | | 30,001 ते 40,000 | | 40,001 ते 50,000 | | 50,001 ते 60,000 च्या पुढे | | एकुन लाभार्थी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लाभा पुर्वी | लाभा नंतर | लाभा पुर्वी | लाभा नंतर | लाभा पुर्वी | लाभा नंतर | लाभा पुर्वी | लाभा नंतर | लाभा पुर्वी | लाभा नंतर | लाभा पुर्वी | लाभा नंतर | |
| 1 | कळमनुरी | 20 | 15 | 30 | 28 | 04 | 11 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | **54** |
| 2 | हिंगोली | 10 | 00 | 25 | 16 | 09 | 20 | 01 | 05 | 00 | 03 | 00 | 01 | **45** |
| 3 | औंढा | 03 | 02 | 32 | 06 | 11 | 24 | 01 | 12 | 01 | 04 | 00 | 00 | **48** |
| 4 | सेनगांव | 07 | 00 | 13 | 04 | 20 | 17 | 02 | 10 | 00 | 05 | 00 | 06 | **42** |
| 5 | वसमत | 09 | 00 | 11 | 10 | 16 | 12 | 02 | 09 | 01 | 02 | 02 | 08 | **41** |
| **एकून** | | **49** | **17** | **111** | **64** | **60** | **84** | **06** | **36** | **02** | **14** | **02** | **15** | **230** |

(स्त्रोत - प्राथमिक सर्वेक्षण )

वर निर्देशित केलेल्या तक्त्याचे अवलोकन केले असता

अ) लाभापूर्वी रु 10,000 /- च्या आतील एकुन 49 लाभार्थी होते या 49 लाभार्थ्यांपैकी लाभानंतर रू. 10,000 /- च्या आतील फक्त 17 लाभार्थी असल्याचे दिसुन येते म्हणजे लाभानंतर 32 लाभार्थीचा आर्थिक स्तर उंचावल्याचे दिसुन आले आहे.

ब) रु. 10,001 /- ते 20,000 /- या टप्यामध्ये लाभापूर्वी एकुन 111 लाभार्थी होते. लाभानंतर 64 लाभार्थी राहीलेत म्हणजेच लाभानंतर 47 लाभार्थीचा आर्थिक स्तर उंचावलयाचे दिसुन येते.

क) रू. 20,001 /- ते 30,000 /- या टप्यामध्ये लाभापूर्वी 60 लाभार्थी होते मात्र लाभानंतर 84 लाभार्थी दिसन आले.

ड) रू. 30,001 /- ते 40,000 /- या टप्यामध्ये लाभापूर्वी 06 लाभार्थी होते मात्र लाभानंतर 36 लाभार्थी दिसून आले.

इ) रू. 40,001 /- ते 50,000 /- या टप्यामध्ये लाभापूर्वी 02 लाभार्थी मात्र लाभानंतर 14 लाभार्थी 15 लाभार्थी दिसुन आले.

ई) रू. 50,001 /- ते 60,000 /- या टप्यामध्ये लाभापूर्वी 02 लाभार्थी होते मात्र लाभानंतर 15 लाभार्थी दिसुन आले.

वरील प्रमाणे क ते ई अवलोकन केले असता लाभापुर्वीच्या लाभार्थ्यांची संख्या घटत जावुन लाभनंतर संख्येत वाढ झाल्याचे दिसुन येते. वरील सर्व बाबीचे अवलोकन केले असता, तेलपंप पुरवठा योजना व एच.डी.पी.ई. पाईप्स पुरवठा या शासकीय योजनेचा व लाभ घेतल्यानंतर त्यांच्या उत्पन्नात वाढ झाल्याने रू. 10,000 /- च्या आतील रू. 10,001 /- ते 20,000 /- , रू. 20,001 /- ते 30,000 /- उत्पन्नवाढीमुळे या गटातील लाभार्थ्यीची संख्या कमी होऊन वाढीव उत्पन्न गटात समाविष्ट झाली आहे. त्यामुळे वाढील उत्पन्न गटातील लाभार्थ्यांच्या संख्येत वाढ झाली आहे.

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता त्यांचे लाभापूर्वी उसलेले उत्पन्न व शासनाने तेलपंप योजनेचा लाभा दिल्यानंतर असलेले उत्पन्नाचे अवलोकन केले असता लाभानंतर त्यांच्या आर्थिक स्थितीमध्ये निश्चीतपणे सुधारणा झाल्याचे दिसुन येते.

**निष्कर्ष शिफारशी :-**

**1)** शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी तेलपंप व एच.डी.पी.ई पाईप्स या दोन्ही बाबीची गरज असते मूल्यमापन

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal (AMIERJ)
A Peer Reviewed Multidisciplinary Journal UGC Approved Journal No 48178, 48818
EduIndex Impact Factor 5.18 ISSN 2278-5655

पाहणीमध्ये असे दिसुन आले की काही लाभार्थ्यांना फक्त तेलपंपाच लभा दिला जातो. तर काही लाभार्थ्यींना फक्त एच.डी.पी.ई. पाईप्स दिल्या जातात. तेलपंप पुरवठा योजना या दोन्ही योजना एकमेकांना पुरक असल्याने शासन नियमाप्रमाणे लाभार्थ्यांकडे आवश्यक त्या प्रमाणात शेती आहे. अशा लाभार्थ्यांना फक्त तेलपंप न देता एच.डी.पी.ई. पाईप्स पुरवठा या योजनेचा लाभ देणे आवश्यक आहे.

**2)** अधिकाअधिक लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ देणे गरजेचे आहे. जेणेकरून तेलपंप व एच.डी.पी.ई पाईप्सचा वापर करून हे लाभार्थी आपल्या शेतीला जलसिंचनाच्या सुविधा देऊ शकतील व त्यामुळे त्यांच्या आर्थिक उत्पन्नात निश्चीत वाढ होईल.

**3)** सध्या अदिवासी शेतकऱ्यांना प्रत्येकी जास्तीत जास्त रूपये 15,000 /- चे पाईप दिले जातात परंतु शेतीचे भिजणारे क्षेत्र व पाण्याचा स्त्रोत यातील अंतर जास्त असल्याने शेतीला पाणी देण्यावर मर्यादा पडतात म्हणून आदिवासी शेतकऱ्यांना शेतीचे भिजणारे क्षेत्र व पाण्याचा स्त्रोत यातील अंतर बघुन जास्तीत जास्त पाईप कमाल मर्यादा रुपये 30,000 /- चे (प्रती) लाभार्थी देणे आवश्यक आहे.

**4)** आदिवासी लाभार्थी शेतकऱ्यांना एकदा तेलपंप दिल्यांनतर तो तेलपंप नादुरुस्त झाल्यास किंवा बिघडल्यास त्याची दुरुस्ती करणे आर्थिक दृष्ट्या फार आवघड असते. याचा स्थानिक लोक व मोटर मॅकेनिक गैरफायदा घेतात व आदिवासी शेतकऱ्यांना लुबाडतात त्यांची ही पिळवणूक टाळण्यासाठी आदिवासी समाजातील बेरोजगार युवकांना तेलपंप व विद्युतपंप संच दुरूस्तीचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. जेणेकरून स्थानिक पातळीवरच तेलपंपाची दुरूस्ती होईल. बेरोजगार युवकांनाही रोजगार मिळेल व आदिवासी शेतकऱ्यांची पिळवणूक टाळता येईल.

**5)** आदिवासी लाभार्थी शेकऱ्यांकडे भांडवलाची कमतरता असते. तसेच संपूर्ण आदिवासी लाभक्षेत्रामध्ये पाण्याची उपलब्धता असली तरी सिंचन योजना नसल्यामुळे पिक उत्पादनक्षमता कमी आहे. त्यासाठी उपसा जलसिंचन योजनेद्वारे 10 ते 15 आदिवासींना या योजनेचा लाभ दिल्यास त्याचा फायदा सर्व आदिवासी लाभार्थ्यींना मिळुन उत्पन्नांत भरीव वाढ होऊ शकेल.

**समारोप**

तेलपंप / एच.डी.पी.ई. पाईप्स पुरवठा या योजनेची परिणामकारक फलश्रुती ही कार्यक्षम प्रकल्प कार्यालयातील प्रकल्प आधिकारी / कर्मचारी वर्ग यांच्यावर अवलंबून आहे. या योजनेतील दोष / त्रुटी व अणिवा दूर करण्यास प्राधान्य व मूल्यमापनातील शिफारशी अंमलबजावणी केल्यास आदिवासी उपयोजनेच्या माध्यमातून आदिवासी लाभार्थी आपल्या शेतीला जलसिंचनाच्या सुविधा

देऊ शकतील व त्यामुळे त्यांच्या आर्थिक उत्पन्नांत निश्चीतच वाढ होईल.

**संदर्भ :-**


1) जिल्हा सामाजीक व आर्थिक समालोचन हिंगोली - 2016

2) आदिवासी संशोधन पत्रिका.

3) वार्षिक आदिवासी उपयोजना, 2014 - 2015

4) वेबसाईड

5) महाराष्ट्रातील आदिवासी जमाती :- डॉ.गोविंद गारे, पान.नं. - 41

6) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, कार्यालय कळमनुरी, माहिती पुस्तीका

7) तेलपंप/विजपंप, एच.डी.पी.ई. पाईप्स लाभार्थ्यांच्या याद्या.